सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९८ | सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. उमेश काटे
तालुकाध्यक्ष : व्हॉईस ऑफ मीडिया, अमळनेर



श्री. जितेंद्र देशमुख
माजी उपाध्यक्ष : खा. शि. मं., अमळनेर



श्री. कमल कोचर
माजी उपाध्यक्ष : खा. शि. मं., अमळनेर



श्री. संदीप घोरपडे
जिल्हा सरचिटणीस : काँग्रेस, जळगाव
(दि.२८ डिसेंबर रोजी वाढदिवस होता.)



## शौर्य संचलनासाठी सज्ज...!








अमळनेर : शौर्य दिनानिमित्त काढण्यात आलेल्या शौर्य संचलन मिरवणुकीत सहभागी बजरंग दल व हिंदू धर्मीय नागरिक. शेवटच्या छायाचित्रात सभेत बोलताना देवगिरी प्रांताचे श्री. कृष्णाजी देशमुख. शेजारी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे श्री. ओमप्रकाश मुंदडा, ह.भ.प. श्री. साळवेकर, देवेंद्र भावसार व डॉ. संजय शहा.
(छायाचित्रे : नितेश बारी)

# भव्य शौर्य संचलनातून हिंदू धर्म एकतेचा संदेश

### बजरंग दलातर्फे प्रथमच आयोजन; असंख्य हिंदू समाजबांधवांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शौर्य दिनानिमित्त शहरात बजरंग दलातर्फे रविवार, दि. २८ डिसेंबर रोजी दुपारी प्रथमच भव्य शौर्य संचलन झाले. शहरातील म्हसकर प्लॉट येथून प्रारंभ झालेली मिरवणूक स्वामीनारायण मंदिर, सुभाष चौक, तिरंगा चौक, संत गाडगेबाबा महाराज चौक, राणा प्रताप चौक व कोर्ट मार्गे पुन्हा म्हसकर प्लॉट येथे येऊन ती सभेत रूपांतरित झाली. या शौर्य संचलनात असंख्य हिंदू धर्मीय नागरिकांसह बजरंग दल, विश्व हिंदू परिषद तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बजरंग दलाच्या कार्याची ओळख, शौर्य, शिस्त व संघटनात्मक एकजूट समाजापर्यंत पोहोचावी, या उद्देशाने या संचलन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले.

श्री. ओमप्रकाश मुंदडा प्रमुख पाहुणे होते. तर बजरंग दलाचे पालक, देवगिरी प्रांताचे श्री. कृष्णाजी देशमुख (नांदेड) प्रमुख वक्ते होते. तसेच आशीर्वचनासाठी ह. भ. प. श्री. सुरेश महाराज साळवेकर, विश्व हिंदू परिषद, जळगाव विभागाचे श्री. देवेंद्र भावसार, तसेच अमळनेर प्रखंड अध्यक्ष डॉ. संजय शहा मंचावर उपस्थित होते. ह. भ. प. श्री. साळवेकर यांनी आशीर्वचनात हिंदू संस्कृतीचे महत्त्व विशद केले. हिंदू धर्मावर आलेली ग्लानी दूर करण्याची जबाबदारी हिंदू समाजाची असल्याचे सांगत आपण धर्माचे रक्षण केले तर धर्म आपले रक्षण करेल, असे मत व्यक्त केले. तसेच पाश्चात्त्य संस्कृतीच्या अंधानुकरणामुळे हिंदू संस्कृती लोप पावत चालल्याची खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. श्री. मुंदडा यांनी बजरंग दलाच्या सेवा, सुरक्षा व संस्कार या ब्रीद वाक्याचे महत्त्व विशद केले.

श्री. देशमुख यांनी भाषणात हिंदू समाज संघटित होण्याची आवश्यकता अधोरेखित केली. देश-विदेशातील हिंदू समाजाची स्थिती मांडत त्यांनी तरुणांनी समाजासाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. रोहित विसपुते यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला. यावेळी बजरंग दलाचे सहसंयोजक आशिष दुसाने (कात्रज, पुणे) हेही उपस्थित होते. याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर या संस्थेचे अनमोल सहकार्य लाभले. नितेश कामदार यांनी सूत्रसंचालन केले व अमर सोनार यांनी आभार मानले.

## कान्हदेश वीरसपुत शिरीषकुमार मेहता

जयंतीनिमित्त दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन...!



या खान्देशी मातीच्या वीर पुत्राला सलाम।
पंधराव्या वयात देशासाठी दिला प्राण।।
रक्ताने लिहिला स्वातंत्र्याचा पवित्र इतिहास।
अमर झाला शिरीष – भारतमातेचा अभिमान।।
जय कान्हदेश...!

### खानदेशातील प्रवाशांना प्रतीक्षा...!

## उधना – पुणे एक्स्प्रेस कधी धावणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सुरत रेल्वे स्थानकावरून पुण्याकडे जाण्यासाठी बऱ्याच रेल्वे गाड्या असल्या तरी त्यांचा प्रत्यक्ष लाभ खानदेशातील जळगाव-उधना मार्गावरील प्रवाशांना होत नाही. या पार्श्वभूमीवर नंदुरबार, शिंदखेडा, अमळनेर, जळगाव, मनमाड मार्गे उधना ते पुणे एक्स्प्रेस सुरू करण्याच्या मागणीने पुनश्च जोर धरला आहे.

पुण्यासाठी विविध राज्यांतून जाणाऱ्या ३७ रेल्वेगाड्या सुरत स्थानकावर थांबतात. मात्र यासर्व गाड्या कल्याण मार्गाने धावतात. त्यामुळे उधना-पुणे ही नवीन गाडी सुरू झाल्यास खानदेशातील प्रवाशांची मोठी सोय होणार असल्याचे मत प्रवासी संघटनेसह स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. प्रस्तावित मार्ग नंदुरबार, दोंडाईचा, अमळनेर, जळगाव, चाळीसगाव, मनमाड आणि दौंड असा असल्यास सर्वच घटकांची सोय होणार आहे.

## दिनविशेष

२९ डिसेंबर

- मास्टर दिनानाथ मंगेशकर यांचा जन्म.
- रामानंद सागर निर्माते-दिग्दर्शक यांचा जन्म.
- ओंकारनाथ ठाकुर गायक, पंडित यांचे निधन.
- राजेश खन्ना सुपरस्टार यांचा जन्म.
- दादासाहेब गायकवाड डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी यांचे निधन.
- जगदीश मोहंती भारतीय लेखक आणि अनुवादक यांचे निधन.

**धनगर समाजाची आरक्षणासाठी अंतिम लढाई; 'एस.टी.' आरक्षणासाठी संघटित राहावे : बोराडे**

पान ३ वर



## कुऱ्हे बुद्रुकच्या शाळेत बाल आनंद मेळावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्हा परिषदेच्या कुऱ्हे बुद्रुक (ता. अमळनेर) येथील प्राथमिक शाळेत शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी प्रथमच बाल आनंद मेळावा घेण्यात आला. सकाळी ८ ते ११ या वेळेत पार पडलेल्या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या खाद्यपदार्थांची विक्री करून प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान मिळविले.


खरेदी-विक्रीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नफा-तोटा, भांडवल, खरेदी व विक्री किंमत यांचा अनुभवातून परिचय झाला.

पान ३ वर

# माजी आमदारांचा आनंद म्हणजे ' बेगाने की शादी में अब्दुल्ला दिवाना'

### आमदार अनिलदादा पाटील : जनता दुधखुळी नाही, स्मिताताई वाघ व साहेबरावदादा आमच्यासोबतच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील पालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचा नगराध्यक्ष निवडून आला. त्यानंतर माजी आमदारांनी आनंदोत्सव साजरा केला. हा आनंद म्हणजे ' बेगाने की शादी में अब्दुल्ला दिवाना ' असा प्रकार आहे. तो उमेदवार कुणाच्या क्रेडिटवर निवडून आला याचे स्वतः आत्मपरीक्षण करावे. जनतेलाही ते ठाऊक असल्याने त्यांना सांगण्याची मुळीच गरज नाही, असा टोला आमदार अनिलदादा भाईदास पाटील यांनी माजी आमदारांना उद्देशून लगावला आहे.

यासंदर्भात आमदार पाटील यांनी पत्रक प्रसिद्धीस दिले आहे. त्यात म्हटले आहे, की पालिका निवडणुकीत आमच्यासोबत कोण होते आणि कोण नव्हते, हे सांगण्याची गरज नाही. जनताही दुधखुळी नाही. खासदार स्मितताई वाघ व माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा आमच्यासोबतच होते आणि यापुढेही राहतील. त्याबाबत आम्हालाच काय येथील जनतेलाही शंका नाही. तुमचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार स्वतःच्या क्रेडिटवर निवडून आला असला, तरी जनतेचा कौल आम्ही स्वीकारला आहे. तुम्हाला तशा शुभेच्छाही दिल्या आहेत. याउलट नंदुरबारच्याही विजयाचा तुम्ही गाजावाजा करतात. परंतु नंदुरबार पालिका निवडणुकीत तुमच्या दोनच जागा निवडून आल्या आणि किती पडल्या हे जनतेलाही जरा कळूद्या. तुमचा स्वतःचा पुत्र किती कमी मतांनी निवडून आला, हे देखील येथील जनतेला कळूद्या. तेथे तुम्हाला यश मिळाले नाही, याचे कारण म्हणजे नंदुरबारची जनता तुम्हाला चांगली ओळखून असल्याने दुसऱ्यांदा तुम्हाला नाकारले आहे. राहिला अमळनेरचा प्रश्न, तर नगराध्यक्षपदाचा विजय हे तुमचे वैयक्तिक यश नाहीच. त्यासोबतच नगरसेवकपदाचे जे तुमचे थोडेफार उमेदवार निवडून आले असतील ते तुमचे असो की आमचे त्यांनी आपापल्या स्वतःच्या प्रभागात वर्षानुवर्षे केलेल्या कामांचे फलित आहे. त्याचे क्रेडिट तुम्ही किंवा आम्ही घेण्याचे काहीही कारण नाही.

विकासाचे व्हीजन म्हणून शहरात विकासकामांसाठी मी अफाट पैसा आणला. शहरात दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी २४ बाय ७ योजना आणून तिचे कामही सुरू केले. रस्त्यांच्या कामासाठी मोठा निधी आणला. त्याकडे लक्ष केंद्रित करून ती कामे कशी लवकरात लवकर पूर्ण होतील त्यासाठी प्रयत्न करा. राहिलेले काम लवकर पूर्ण करा, तुमच्या नगरसेवकांना २ ते ४ कोटींची कामे कशी मिळतील त्यासाठी प्रयत्न करा, निवडणूक वचननाम्यानुसार प्रॉपर्टी टॅक्स कमी करणे असेल याशिवाय इतर महत्त्वपूर्ण विकासकामांसाठी आमचे पूर्ण सहकार्य असणार असल्याने ते पूर्ण करा.

माजी आमदारांना माझ्या मंत्रीपदाबाबत चिंता आहे, की धाक याबाबत मी देखील संभ्रमात आहे. परंतु त्यांनी काळजी करू नये. मंत्रिपद आज मिळो की उद्या आजही या भूमीतील विकासाचा आलेख उंचावण्यासाठी आमदार म्हणून मी सक्षम आहे. तुम्ही नंदुरबारकर असल्याने तिकडेच चांगले लक्ष घालावे. निवडणूक येते आणि जाते. राजकारणात स्तर बदलतही असतात. येणाऱ्या काळात निश्चितच या भूमीच्या दृष्टीने चांगले घडलेले तुम्हाला दिसेल. त्यामुळे ' वेट अँड वॉच' करा, असा सल्ला आमदार पाटील यांनी देत मी जनतेसाठी रात्रंदिवस कधीही उभा राहील, अशी ग्वाही दिली आहे.

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८
जाहीर नम्र विनंती
मतदान तारीख: रविवार, ता. ४/१/२०२६ सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत
मतदान ठिकाण: प्रताप कॉलेज, अमळनेर, (जि.जळगाव)
कार्यकारी मंडळ सदस्य पदाच्या उमेदवार
अनुक्रमांक १२
निवडणूक चिन्ह : रिक्षा






लीना प्रवीण पाटील
अनुक्रमांक १२ समोरील रिक्षा या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८
जाहीर नम्र विनंती
मतदान तारीख: रविवार, ता. ४/१/२०२६ सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत
मतदान ठिकाण: प्रताप कॉलेज, अमळनेर, (जि.जळगाव)
कार्यकारी मंडळ सदस्य पदाचे उमेदवार
अनुक्रमांक १७
निवडणूक चिन्ह : कपाट





जितेंद्र शांतीलाल झाबक
अनुक्रमांक १७ समोरील कपाट या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८
जाहीर नम्र विनंती
मतदान तारीख: रविवार, ता. ४/१/२०२६ सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत
मतदान ठिकाण: प्रताप कॉलेज, अमळनेर, (जि.जळगाव)
अध्यक्ष पदाचे उमेदवार
अनुक्रमांक २
निवडणूक चिन्ह : पंखा





विनोद जगदीश अग्रवाल
अनुक्रमांक २ समोरील पंखा या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा



# ‘ एआय ’वरील विश्वास उडाला ?

## चार हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढणाऱ्या सेल्फफोर्सला आता ‘ या ’ कारणाने पश्चाताप!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘ एआय ’चा बोलबाला आता ओसरू लागला असल्याचे चित्र किमान ‘ सेल्फफोर्स ’ या कंपनीपुरते तरी दिसत आहे. एकेकाळी जनरेटिव्ह एआय चे जोरदार समर्थन करणारी ही दिग्गज सॉफ्टवेअर कंपनी आता विश्वासार्हतेच्या समस्यांमुळे त्याचा वापर हळूहळू कमी करत आहे.

विशेष म्हणजे आपल्या ‘ एजंटफोर्स ’ या एआय प्लॅटफॉर्मद्वारे कामे स्वयंचलित करून सुमारे चार हजार कर्मचाऱ्यांची कपात केल्यानंतर आता गेल्या वर्षभरात एआय मॉडेल्सवरील आपला विश्वास कमी झाल्याचे सेल्फफोर्स कंपनीने उघडपणे मान्य केले आहे.

**मॉडेलला नव्हे, डेटाला महत्त्व**

‘ सेल्फफोर्स ’ने आता रणनीती बदलली असून, एआय मॉडेलपेक्षा डेटा क्वालिटीला प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. जर डेटाचा पाया मजबूत नसेल, तर एआय चुकीची माहिती देऊ शकते, असा इशारा दिला आहे. सध्या कंपनीच्या शेअर्समध्येही सुमारे ३४ टक्क्यांची घसरण पाहावयास मिळत आहे.

**नियोजनाचा फटका आणि कर्मचारी कपात**

‘ सेल्फफोर्स ’ ने आपल्या ‘ एजंटफोर्स ’ या एआय प्लॅटफॉर्मचा वापर वाढवून सुमारे चार हजार कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या कमी केल्या होत्या. कंपनीचे सीईओ मार्क बेनिऑफ यांच्या सांगण्यानुसार ‘ एआय ’ च्या वापरामुळे त्यांना नऊ हजार ऐवजी केवळ पाच हजार कर्मचाऱ्यांची गरज भासत आहे. मात्र ज्या तंत्रज्ञानावर एवढा मोठा जुगार खेळला गेला त्याची विश्वासार्हता आता धोक्यात आली आहे.

**विश्वास का उडाला ?**


‘ द इन्फॉर्मेशन ’च्या अहवालानुसार ‘ सेल्फफोर्स ’च्या प्रॉडक्ट मार्केटिंगच्या वरिष्ठ उपाध्यक्षांच्या सांगण्यानुसार एका वर्षापूर्वी आम्हा सर्वांचा लार्ज लँग्वेज मॉडेल्सवर जो विश्वास होता तो आता तितका राहिलेला नाही. ‘ एआय ’ला एका वर्षापूर्वी आम्हा सर्वांचा लार्ज लँग्वेज मॉडेल्सवर जो विश्वास होता तो आता तितका राहिलेला नाही. ‘ एआय ’ला जेव्हा एकापेक्षा जास्त सूचना दिल्या जातात तेव्हा ते कामात चुका करते किंवा दिलेल्या सूचना विसरते, असे निरीक्षण कंपनीच्या तंत्रज्ञांनी नोंदविले आहे. ‘ एआय ’ मॉडेल्सना ८ पेक्षा जास्त सूचना दिल्यास ते मुख्य उद्दिष्ट विसरतात. ग्राहक जेव्हा चॅटबॉटला मूळ विषय सोडून प्रश्न विचारतात तेव्हा चॅटबॉट आपले मुख्य काम सोडून भरकटतो. अनेकदा ‘ एआय ’ने आवश्यक सर्वेक्षणे न पाठविल्याच्या तक्रारी ग्राहकांनी केल्या आहेत.



**हिंदू विवाह कायदा**

# घटस्फोटाच्या तरतुदींचा उदार अर्थ लावल्यास विवाहाचे पावित्र्य कमी होईल; दिल्ली उच्च न्यायालय





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू विवाह कायदा १९५५ मधील विवाह रद्द करणे किंवा घटस्फोटास परवानगी देणाऱ्या तरतुदींचा अर्थ कठोर आणि मर्यादित स्वरूपात लावला पाहिजे. या तरतुदींचा व्यापक किंवा उदार अर्थ लावल्यास विवाहाचे पावित्र्य आणि स्थिरता धोक्यात येईल, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदविले. तसेच सप्तपदीसह आवश्यक धार्मिक विधी न झाल्याच्या कारणास्तव विवाह रद्द होत नाही, असेही न्यायमूर्ती अनिल क्षत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

‘ बार ॲण्ड बेंच’च्या वृत्तानुसार एका जोडप्याने ब्रिटनचा व्हिसा मिळविण्यासाठी आर्य समाज मंदिरात घाईघाईत विवाह केला आणि त्याची नोंदणी केली. मोठ्या समारंभाची योजना असताना वाद निर्माण झाले आणि आवश्यक विधी न झाल्याच्या कारणास्तव त्यांनी विवाह सुरूवातीपासूनच अवैध घोषित करण्याची मागणी कौटुंबिक न्यायालयात केली. कौटुंबिक न्यायालयाने ही मागणी फेटाळल्यानंतर जोडप्याने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

**न्यायालयाचे निरीक्षण**

याचिकेवर सुनावणीवेळी खंडपीठाने स्पष्ट केले, की अशा मागण्यांमुळे विवाहाची स्थिरता, प्रतिष्ठा आणि टिकाऊपणा जपण्याचा कायदेशीर उद्देश दुर्लक्षित होईल. हिंदू विवाह कायदा १९५५ मधील तरतुदी, विशेषतः शून्य घोषित करणारे विवाह, रद्द करण्यायोग्य विवाह, घटस्फोट आणि न्यायिक वेगळेपणा यासंबंधीच्या तरतुदींचा अर्थ आणि वापर कठोरपणे केला पाहिजे. केवळ स्पष्टपणे परिभाषित परिस्थितीतच घटस्फोटाला परवानगी द्यावी.

**विवाह रद्द करण्याची मागणी अयोग्य**

न्यायालयाने असेही नमूद केले, की आवश्यक विधी न झाल्याच्या कारणास्तव विवाह रद्द करण्याची मागणी हिंदू विवाह कायद्याअंतर्गत टिकणारी नाही. कायद्यात अशी कोणतीही तरतूद नाही जी कलम ७ नुसार विवाह कधीही संपन्न झाला नाही. या कारणास्तव तो सुरूवातीपासूनच अवैध घोषित करण्यास सक्षम करते. घटस्फोटासाठीची कारणे निश्चित करणाऱ्या सर्व तरतुदी केवळ विधिवत संपन्न झालेल्या विवाहांनाच लागू होतात. त्यामुळे खंडपीठाने कौटुंबिक न्यायालयाचा आदेश कायम ठेवला.

**विवाह नोंदणी प्रणालीवर परिणाम**

खंडपीठाने याचिकेला कायद्याचा गैरवापर करण्याचा प्रयत्न मानले. अशी मागणी मान्य केल्यास विवाह नोंदणी प्रणालीची बदनामी होऊ शकते. याचे आंतरराष्ट्रीय परिणाम होऊ शकतात. काही धूर्त व्यक्ती कागदपत्रे मिळवण्यासाठी किंवा गैरकृत्याला वैधता देण्यासाठी याचा गैरवापर करू शकतात, असेही न्यायालयाने नमूद केले.

# ‘...तर खेळपट्टी उद्ध्वस्त करू’,

## ‘आयपीएल’ मधील बांगलादेशी खेळाडूंना विरोध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बांगलादेशात पुन्हा एकदा राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. तेथील अल्पसंख्याकांवर आणि विशेष करून हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत. दोन



**धार्मिक नेत्याने दिला उघड इशारा**

आठवड्यांत दोन हिंदू तरुणांची जमावाने मारहाण करून हत्या केल्याची घटना घडली आहे. याचे पडसाद भारतात उमटले असून, दिल्लीतील बांगलादेशच्या उच्चायुक्तालयाबाहेर हिंदू संघटनांनी तीव्र आंदोलन केले. यानंतर आता धार्मिक नेत्याने थेट आयपीएलचे सामने उधळून लावण्यात येतील, अशी धमकी दिली आहे. बांगलादेशी खेळाडू भारतात खेळले तर त्या मैदानावरील खेळपट्टी उखडून टाकू, असा इशारा देण्यात आला आहे.

बांगलादेशमध्ये फेब्रुवारी महिन्यात सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. त्या आधी मोठ्या प्रमाणात हिंसाचार उसळला आहे. हिंदूंवर हिंसक हल्ले होत असून, बांगलादेशमधील कोट्यवधी अल्पसंख्याक भीतीच्या सावटाखाली आहेत. दीपू चंद्र दास आणि अमृत मोंडल नामक दोन तरुणांचे लिंचिंग झाल्यानंतर भारतात संताप व्यक्त केला जात आहे.

अशी परिस्थिती असताना आता उज्जैनमधील रिंमुक्तेश्वर महादेव मंदिराचे मुख्य पुजारी महावीर नाथ यांच्यासह काही साधूंनी एकत्र येत माध्यमांना प्रतिक्रिया दिली. जर बांगलादेशी खेळाडू आयपीएलसाठी मैदानात खेळण्यासाठी उतरले तर धार्मिक योद्धे मैदानावर उतरतील. बांगलादेशमध्ये एका बाजूला हिंदूंचा छळ होत असताना दुसऱ्या बाजूला त्यांच्या क्रिकेटपटूंना भारतात खेळण्याची परवानगी देऊ नये. तसेच इतर धार्मिक नेत्यांनीही यासाठी पुढे यावे, असे आवाहन मुख्य पुजाऱ्यांनी केले आहे.

**मुस्तफिजूर रहमानमुळे केकेआरवर बहिष्काराचा इशारा**

नुकत्याच झालेल्या आयपीएलच्या मिनी ऑक्शनमध्ये बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिजूर रहमान यांच्यावर कोलकाता नाइट रायडर्सने ९.२० कोटी रुपयांची बोली लावून त्याला संघात घेतले. मात्र आता अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अत्याचारांच्या घटनांनंतर केकेआर संघावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन सोशल मीडियावर केले जात आहे.

मुस्तफिजूर रहमान २०१६ मध्ये आयपीएलमध्ये सहभागी झाला. आजवर पाच आयपीएल संघांमधून ६० सामने तो खेळला आहे. यात त्याला ६५ विकेट मिळाल्या आहेत. मागच्या हंगामात तो दिल्ली कॅपिटल्सकडून केवळ तीनच सामने खेळू शकला होता. यात त्याने ४ विकेट घेतल्या होत्या.

बांगलादेशकडून खेळताना मुस्तफिजूर रहमानने एकूण १५ कसोटी, १६ वन-डे आणि १२६ टी-२० सामने खेळले आहेत. कसोटीत त्याने ३१, वन-डेमध्ये १७७ आणि टी-२० फॉरमॅटमध्ये १५८ विकेट घेतल्या आहेत.

# शिळा भात सतत खाताय ?

## वेळीच थांबा नाही तर उद्भवतील ‘ या ’ समस्या..



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात जास्तीत जास्त लोक जेवताना भात खातात. अनेकांना तर भात असल्याशिवाय जेवणही जात नाही. भात हा आरोग्यासाठी फार फायदेशीर असतो. आजकाल अनेकांना वजनवाढीच्या समस्येचा त्रास होत आहे. अशात लोकांना वाटते, की त्यांनी भात खाल्ला, तर वजन वाढते. पण भात आवडणारे लोक भात खाणे काही सोडत नाहीत. जास्तीत जास्त घरांमध्ये रात्री शिल्लक राहिलेला भात सकाळी गरम करून किंवा त्याला फोडणी देऊन नाश्ता म्हणून खाल्ला जातो. मात्र अनेकांना हे माहीत नसते, की एकदा शिजवलेल्या भाताला पुन्हा एका वेळेपेक्षा जास्त वेळा गरम करणे धोक्याचे ठरू शकते.

**रात्रीचा शिळा भात का खाऊ नये ?**

**जीवाणू संसर्ग**

शिजवलेल्या भातामध्ये बहुतेकदा बॅसिलस सेरियस जीवाणूचे बीजाणू असतात. भात पुन्हा शिजवल्याने हे बीजाणू नष्ट होत नाहीत. जेव्हा तांदूळ शिजवल्यानंतर खोलीच्या तापमानावर थंड होण्यासाठी बाजूला ठेवला जातो तेव्हा ते जीवाणू वेगाने वाढतात आणि विष तयार करतात. हे विष पुन्हा गरम करूनही कमी होत नाही.

**अन्नातून विषबाधा**

या जीवाणूंनी दूषित झालेला भात खाल्ल्याने अतिसार, उलट्या व पोटदुखी यांसारख्या गंभीर समस्या उदभवू शकतात. ही लक्षणे साधारणपणे एक ते पाच तासांत दिसून येतात.

**पोषक तत्त्वांचा नाश**

उरलेला भात पुन्हा गरम केल्याने त्यात असलेल्या काही पाण्यात विरघळणाऱ्या जीवनसत्त्वांचे प्रमाण कमी होऊ शकते.

**रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होणे**

शिळ्या भातामध्ये थंडावा असतो, ज्यामुळे कफ वाढू शकतो. घसा खवखवणे, सर्दी-खोकला असा त्रासही होऊ शकतो; ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते.

**वाताचा त्रास**

शिळ्या भातामध्ये गारवा असल्याने तो वाताचा त्रास असलेल्यांनी खाऊ नये. अनेकदा शिळा भात वाताचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढवण्यास कारणीभूत ठरू शकतो.

# ‘ त्याला कोणाचीही पर्वा नाही...’

## अक्षय खन्नाबद्दल सुप्रसिद्ध अभिनेत्याचे वक्तव्य चर्चेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आदित्य धरच्या ‘ धुरंधर ’ या चित्रपटात पाकिस्तानी दरोडेखोर रहमानची भूमिका साकारणारा अक्षय खन्ना सध्या चर्चेत आहे. सर्वजण त्याचे कौतुक करत आहेत. त्याच्या अभिनयाने इतर कलाकारांनाही मागे टाकले आहे. आता अर्शद वारसीनेही अभिनेत्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल खुलासा केला आहे. त्याने एका मुलाखतीत म्हटले आहे, की अक्षय कोणाचीही पर्वा करत नाही. तो त्याच्याच जगात असतो.

अर्शद वारसीने अक्षय खन्नासोबत ‘ हलचल ’ (२००४) आणि ‘ शॉर्ट कट ’ (२००९) या दोन चित्रपटांमध्ये काम केले आहे. अशातच आता एका मुलाखतीत अर्शदला अक्षयबद्दल विचारण्यात आले. त्यावर अभिनेता म्हणाला, ‘ तो एक सीरियस माणूस आहे. तो एक चांगला अभिनेता आहे. यात काही शंका नाही. पण तो त्याच्याच जगात असतो.’

**अक्षय खन्नाबद्दल काय म्हणाला अर्शद वारसी ?**

अर्शद वारसी म्हणाला, की त्याला तुमची पर्वा नाही. त्याला कोणाचीही पर्वा नाही. त्याचे स्वतःचे आयुष्य आहे. तुम्ही माझ्याबद्दल काय विचार करता किंवा करत नाही, ही तुमची अडचण आहे. माझी नाही.

**अक्षय खन्नाला कायदेशीर नोटीस मिळाली**

अक्षय खन्ना सध्या ‘ दृश्यम ३ ’ चित्रपटामुळे चर्चेत आहे. ‘ छावा ’ आणि ‘ धुरंधर ’सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांचा भाग असलेल्या या अभिनेत्याने अजय देवगणच्या चित्रपटातून काढता पाय घेतला आहे. त्यानंतर ‘ दृश्यम ३ ’च्या निर्मात्यांनी अक्षयला कायदेशीर नोटीस पाठवली आणि दावा केला, की त्यांनी जयदीप अहलावटला कास्ट केले असून तो अक्षयपेक्षा चांगला अभिनेता आणि चांगला माणूस आहे. मुलाखतीत कुमार मंगत अक्षय खन्नाबद्दल म्हणाले, की ‘ काही कलाकार मल्टीस्टारर चित्रपट करतात आणि जेव्हा ते चित्रपट हिट होतात तेव्हा ते कलाकार स्वतःला स्टार मानतात. अक्षयसोबत नेमके हेच घडले.

# बचपन में हुआ पोलियो, फोटोकॉपी से शुरुआत,

**सक्सेस स्टोरी**

## विशाल मेगामार्ट बेचना पड़ा; फिर खड़ा किया वी टू रिटेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वी टू रिटेल आज देशभर में फेमस है। यहां आपको कपड़े, साबुन, जूते, बर्तन, खिलौने से लेकर हर वो चीज मिल जाती है, जो आम आदमी की जरूरत है। ये इसलिए भी ग्राहकों द्वारा पसंद किया जाता है, क्योंकि एक ही दुकान में आपको अपने जरूरत की हर चीज मिल जाती है। वी टू रिटेल के शेयर ने आज ऑल टाइम हाई रिकॉर्ड बनाया है।लेकिन क्या कभी आपने सोचा है कि इसके पीछे का मास्टरमाइंड कौन है ?

राम चंद्र अग्रवाल केवल बिजनेसमैन नहीं है, बल्कि हर उस व्यक्ति के लिए प्रेरणा हैं, जो कुछ बड़ा करने का ख्वाब देखते हैं। उन्होंने वी टू रिटेल के अलावा विशाल मेगा मार्ट की भी शुरुआत की थी।

शायद ही कभी किसी ने सोचा हो कि फोटोकॉपी शॉप चलाने वाला लड़का कभी करोड़ों की कंपनी का मालिक बनेगा। आइए जानते हैं कि उन्होंने कैसे वी टू रिटेल की शुरुआत की।

**कैसे हुई विशाल मेगामार्ट की शुरुआत ?**

बचपन में पोलियो होने के कारण वे जिंदगी भर के लिए दिव्यांग हो गए। दिव्यांग होने की वजह बचपन से ही उन्हें कई परेशानियों से जूझना पड़ा। ग्रेजुएशन पूरी होने के बाद उन्हें चार पैसे कमाने के लिए फोटोकॉपी शॉप की शुरुआत करनी पड़ी। क्योंकि उनके परिवार की आर्थिक स्थिति उस समय इतनी अच्छी नहीं थी।

फोटोकॉपी शॉप में उन्होंने एक साल काम किया, जिसके बाद उन्होंने कोलकाता में १५ साल के कपड़ों की दुकान खोली। इस दुकान के जरिए उन्हें ग्राहकों के व्यवहार और व्यापार के बारे में काफी कुछ जानने को मिला। इसके बाद उन्होंने साल २००१ में विशाल रिटेल की शुरुआत की। उन्होंने अपना ये बिजनेस दिल्ली में शुरू किया। जब उनका ये बिजनेस लोगों के बीच मशहूर होने लगा, तब उन्होंने इसका नाम विशाल रिटेल से विशाल मेगा मार्ट रख दिया। उन्होंने अपने शॉप की और ब्रांच खोलने के लिए बैंकों से भारी लोन भी लिया।

**क्यों बेचना पड़ा बिजनेस ?**

साल २००८ में स्टॉक मार्केट में भारी गिरावट आई। इससे विशाल मेगा मार्ट को 750 करोड़ रुपये का नुकसान हुआ। कंपनी दिवालिया के लगभग करीब आ गई थी। इस समय राम चंद्र ने कंपनी को बेचने का निर्णय लिया। उन्होंने श्रीराम ग्रुप और टीपीजी कैपिटल को विशाल ब्रांड ७० करोड़ रुपये में बेच दिया। लेकिन उनका ये सफर यहीं खत्म नहीं हुआ।

**वी टू रिटेल कैसे बना ?**

अग्रवाल ने वी टू रिटेल का पहला स्टोर में जमशेदपुर में शुरू किया था। साल २०१३ में उनके इस स्टोर ने १०० करोड़ से ज्यादा कमाया था। रिटेल बिजनेस में राम चंद्र के इस कमबैक ने सभी को हैरान कर दिया। साल २०१४ में उनके बिजनेस ने २२५ करोड़ रुपये का टर्नओवर क्रॉस कर दिया था।

साल २०२४ में वी टू रिटेल के भारत में १५० से ज्यादा स्टोर मौजूद है। आज राम चंद्र अग्रवाल की नेटवर्थ ५६०० करोड़ से ज्यादा है।

उनके इस बिजनेस में उनकी पत्नी उमा अग्रवाल डायरेक्टर के रूप में काम करती है। वहीं उनका बेटा आकाश भी यहां डायरेक्टर के रूप में काम करता है।

**वी टू रिटेल ने बनाया ऑल टाइम हाई रिकॉर्ड**

राम चंद्र की कंपनी वी टू रिटेल के शेयर ने आज २,३४८.९० रुपये प्रति शेयर पहुंचकर ऑल टाइम हाई रिकॉर्ड बनाया है। दोपहर १२.४१ बजे अभी एनएसई पर इसके एक शेयर की कीमत २२०० रुपये से ज्यादा दर्ज की गई है। इसके शेयर में आज ७६.६० रुपये की बढ़ोतरी है, जो ३.५३ फीसदी है।



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# धनगर समाजाची आरक्षणासाठी अंतिम लढाई; ‘एस.टी.’ आरक्षणासाठी संघटित राहावे : बोराडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : धनगर समाजाला संविधानानुसार एस.टी. प्रवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी राज्यभर आंदोलन सुरू आहे. आता लढाई निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून, आरक्षणासाठीची ही शेवटची लढाई आहे, असे प्रतिपादन एस.टी. आरक्षणाचे प्रवर्तक दीपक बोराडे यांनी शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी येथे आयोजित कार्यक्रमात केले.

आरक्षणासंदर्भात भूमिका मांडताना ते म्हणाले, की राज्यातील अनेक समाजांनी आरक्षणासाठी दीर्घकाळ संघर्ष केला आहे. मात्र धनगर समाजातील अज्ञान व भोळेपणामुळे समाजाचा खरा मित्र ओळखता आला नाही. राजकारणी चतुर व धूर्त असून समाजाने आजपर्यंत मोठ्या प्रमाणावर पैसा व वेळ खर्च केला, तरीही अपेक्षित यश मिळालेले नाही. समाजाकरिता विविध ठिकाणी आंदोलने झाली. परंतु आता ही लढाई अंतिम व निर्णायक आहे.

धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातून आरक्षण मिळाल्यास समाजातील सर्व घटकांचे कल्याण होईल. हे आरक्षण पूर्णपणे घटनात्मक हक्कांवर आधारित आहे. त्यासाठी फक्त राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे, असेही बोराडे यांनी स्पष्ट केले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही धनगर समाजाला एस.टी. आरक्षण दिले जाईल, असे आश्वासन दिले होते. परंतु अद्याप ते प्रत्यक्षात मिळालेले नाही. त्यामुळे येणाऱ्या काळात समाजाने एकसंघ राहून ताकदीने संघर्ष करणे आवश्यक आहे. सरकारने तत्काळ दखल घ्यावी अन्यथा समाजाला पुढील भूमिका ठरवावी लागेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक सुयोग धनगर, सुवर्णा हटकर, दीपक चौगुले यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अर्बन बँकेचे संचालक मोहन सातपुते व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक समाधान धनगर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन बोराडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

धनगर समाजाचे ज्येष्ठ पदाधिकारी बन्सीलाल भागवत यांनी प्रास्ताविकात समाजाची झालेली पीछेहाट मांडत समाजाने एकत्र राहून नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. यावेळी राष्ट्रवादी भटक्या-विमुक्त सेलचे तालुकाध्यक्ष एस. सी. तेले यांनी राज्यभर उपोषण करून आरक्षणासाठी लढा उभारणार असल्याची घोषणा करीत समाजबांधवांनी या आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन केले.

यावेळी भाजप शहर उपाध्यक्ष देवा लांडगे, दिलीप ठाकरे, नामदेव ठाकरे, शांताराम ठाकरे, चेतन देवरे, आनंदा धनगर, दिनेश भलकर, मनोज रत्नपारखी, गजानन धनगर, ए. बी. धनगर, दिलीप खांडेकर, प्रा. जी. एल. धनगर, त्र्यंबक धनगर, परशुराम ठाकरे, तुषार धनगर, मनोज मोरे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. चेतन देवरे यांनी सूत्रसंचालन केले.

## कुऱ्हे बुद्रुकच्या शाळेत बाल आनंद मेळावा

पान १ वरून

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान देणे, नोटा व नाण्यांची ओळख करून देणे, उद्योग-व्यवसायाची गोडी निर्माण करणे तसेच संवाद कौशल्याचा विकास करणे, हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. सरपंच स्नेहा दीपक बिऱ्हाडे यांच्या हस्ते आनंद मेळाव्याचे उद्घाटन झाले. उपसरपंच विजय पाटील, माजी सरपंच महेंद्र पाटील, प्रवीण पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक, शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालक व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पदार्थांची मेळाव्यात उत्स्फूर्तपणे खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले. या उपक्रमातून सुमारे पाच हजार रुपयांची उलाढाल झाली. कार्यक्रम यशस्वितेसासाठी माजी विद्यार्थी संघ, शाळा व्यवस्थापन समिती, सतीमाता ट्रस्ट व सतीमाता युवा फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. अशोक पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक रियाज शेख यांनी आभार मानले.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# व्याकरण म्हणजे अर्थपूर्ण शब्दनिर्मिती : डॉ. पाटील

## अमळनेरला ‘स्पर्धा परीक्षा आणि व्याकरणा’वर कार्यशाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : येथील खान्देश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयांतर्गत करिअर कौन्सिलिंग सेंटरमध्ये रविवार, दि. २८ डिसेंबर रोजी स्पर्धा परीक्षा कार्यशाळा घेण्यात आली. सकाळी ११ ते दुपारी १ दरम्यान झालेल्या कार्यशाळेत ‘ स्पर्धा परीक्षा आणि व्याकरण ’ या विषयावर डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

प्रारंभी डॉ. पाटील व डॉ. कांबळे यांचे करिअर कौन्सिलिंग सेंटरचे प्रमुख प्रा. विजय तुंटे यांनी सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. डॉ. पाटील म्हणाले, की इंग्रजी व्याकरण फक्त स्पर्धा परीक्षेसाठी महत्त्वाचे नाही, तर जीवनात अतिशय महत्त्वाचे आहे. व्याकरण हा विषयाचा आत्मा असतो. व्याकरण समजून घेतल्यास अर्थपूर्ण शब्दांची निर्मिती करते. कर्ता, क्रियापद, वाक्य, काळ आदी शब्दांच्या जातींची शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली. त्यात काळाचे १२ प्रकार, व्याकरणाचा क्रम, हॅव्ह, हॅज, डज, डू हे कसे वापरावेत? प्रश्नपत्रिका व सराव मागील वर्षांच्या किंवा मॉडेल इंग्लिश ग्रामर संबंधित प्रश्नपत्रिका कशा सोडवाव्यात? पॅटर्न बघून कोणत्या प्रकारचे प्रश्न जास्त विचारले जातात ते कसे नोंदवावेत? स्वतः छोटी चाचणी परीक्षा तयार करून वेळेत पेपर सोडविण्याचा सराव कसा करावा? झालेल्या चुका स्वतंत्र वहीत लिहून मिस्टेक बुक कसे तयार ठेवावे? स्वतःच्या उणिवा ओळखत चुका कशा दुरुस्त कराव्यात? यासंबंधी सूक्ष्म विवेचन करीत मार्गदर्शन केले.

डॉ. कांबळे यांनी मराठी व्याकरणावरील व्याख्यानात व्याकरण फक्त स्पर्धा परीक्षेपुरते मर्यादित नाही तर ज्ञानाचे आकलन हे व्याकरणाद्वारे परिपूर्ण होते. व्याकरणात भाषा महत्त्वाचे असते. अर्थात माणूस होण्यासाठी चांगल बोलता येणे हा एक निकष असतो, असे सांगितले. तसेच मारुती चितमपल्ली यांनी विविध पक्ष्यांच्या सांकेतिक भाषासंबंधीच्या कथा सांगितल्या. त्याचप्रमाणे वर्ण विचार, शब्द, रूप विचार, वाक्य, संधी, समास, अलंकार, शुद्धलेखन यावर विस्तृतपणे मांडणी केली. वर्णमाला हे ध्वनी आहेत, यात काही शब्द मूर्तपणे पुढे येतात. एकूणच वर्ण-शब्द-वाक्य-विचार याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. विजय तुंटे यांच्यासह ४५ विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. अमित पाटील, प्रा. विजय साळुंखे, डॉ. बालाजी कांबळे, प्रा. हिमांशू गोसावी, पराग रवींद्र पाटील, तुषार पाटील, सुरेशराव सोनवणे, चंद्रकला चौधरी यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी सहकार्य केले. प्रा. विजय साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# एलपीजी, पॅन-आधार अन्...

## १ जानेवारी २०२६ पासून ‘ हे ’ नियम बदलणार; सर्वसामान्यांवर काय परिणाम होणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




२०२५ हे वर्ष संपायला आता काही दिवस उरले आहेत. पुढील आठवड्यात नवीन वर्ष सुरू होईल. २०२६ मध्ये अनेक महत्त्वाचे बदल होणार आहेत. ज्याचा थेट परिणाम लोकांच्या खिशावर होईल. या बदलांमध्ये पॅन-आधार लिंकिंग, एलपीजी गॅस सिलिंडर, आठवा वेतन आयोग, व्याजदरातील बदल आणि क्रेडिट नियमांमधील बदल यांचा समावेश आहे.

सरकारने पॅन कार्ड आधारशी लिंक करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५ निश्चित केली आहे. जर कोणत्याही कारणास्तव कोणी त्यांचे पॅन कार्ड आधारशी लिंक केले नाही तर १ जानेवारी २०२६ पासून त्यांचे पॅन कार्ड अवैध ठरेल. यामुळे पॅन कार्डशी संबंधित काम पूर्ण करण्यात अडचणी येऊ शकतात. जर तुम्ही अद्याप तुमचा पॅन आधारशी लिंक केला नसेल, तर तुम्ही ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी.

केंद्र सरकार १ जानेवारी २०२६ पासून आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करेल, अशी अपेक्षा आहे. गेल्या काही दिवसांपासून आठव्या वेतन आयोगाबाबत चर्चा सुरू आहे. नवीन वर्षाच्या सुरूवातीला सरकार आपल्या केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना नवीन वर्षाची भेट देऊ शकते. जर काही विलंब झाला तर त्याचे फायदे कर्मचाऱ्यांना थकबाकीच्या स्वरूपात दिले जातील. नवीन वर्षात सरकार रेशन कार्डशी संबंधित नियम सोपे करण्याचा प्रयत्न करेल. आता रेशन कार्ड मिळविण्यासाठी कार्यालयांमध्ये जाण्याची आवश्यकता नाही. ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. ग्रामीण भागातील लोकांना याचा फायदा होईल, अशी अपेक्षा आहे. एलपीजी आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतींचा आढावा दर महिन्याच्या पहिल्या दिवशी घेतला जातो. डिसेंबरमध्ये व्यावसायिक गॅसच्या किमती अंदाजे १० रुपयांनी कमी करण्यात आल्या होत्या. आता नवीन वर्षाच्या सुरूवातीसह घरगुती वापराच्या सिलिंडरच्या किमतीत काही प्रमाणात दिलास मिळण्याची शक्यता आहे. ज्याचा थेट फायदा जनतेला होईल. नवीन वर्षात क्रेडिट कार्ड नियमात बदल होणार आहेत. आतापर्यंत क्रेडिट ब्युरो दर १५ दिवसांनी क्रेडिट स्कोअर अपडेट करत होते. परंतु १ जानेवारी २०२६ पासून ही प्रक्रिया आठवड्याला म्हणजे दर ७ दिवसांनी होईल. यामुळे कर्ज पात्रता आणि क्रेडिट इतिहासाची माहिती अधिक जलद आणि जवळजवळ वास्तविक वेळेत उपलब्ध होईल.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

## उंचीत नंबर १!

# पुण्याच्या ‘ कुलकर्णी ’ कुटुंबाची भारतातील सर्वांत उंच कुटुंब म्हणून ओळख

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पुण्यातील कुलकर्णी कुटुंब सध्या त्यांच्या आगळ्यावेगळ्या उंचीमुळे सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरले आहे. या ‘ उंच ’ कुटुंबाबद्दलची रंजक माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहरात एक असे कुटुंब राहते, की ज्यांची उंची पाहून कोणीही थक्क होईल. कुलकर्णी कुटुंब हे भारतातील सर्वांत उंच कुटुंब मानले जाते. या कुटुंबातील प्रत्येक सदस्याची उंची सरासरी भारतीयापेक्षा कितीतरी जास्त आहे.

**लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद**

या कुटुंबाची नावे ‘ लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड ’मध्ये नोंदविली गेली आहेत. इतकी उंची असल्यामुळे त्यांना अनेकदा काही अडचणींचाही सामना करावा लागतो. जसे की घराचे दरवाजे उंच करणे, कपडे आणि पादत्राणे मिळविण्यासाठी कसरत करणे किंवा सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करणे. मात्र या सर्व आव्हानांना हे कुटुंब आनंदाने सामोरे जाते.



**सोशल मीडियावर चर्चा**

कुलकर्णी कुटुंबाचे फोटो आणि माहिती सध्या इंटरनेटवर प्रचंड व्हायरल होत आहे. लोक त्यांच्या या नैसर्गिक देणगीचे आणि आत्मविश्वासाचे कौतुक करत आहेत. पुण्याच्या या कुटुंबाने आपल्या उंचीमुळे संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे.

**कुटुंबातील सदस्यांची उंची अशी**

- शरद कुलकर्णी (वडील) : ७ फूट ३ इंच
- संजीत कुलकर्णी (आई) : ६ फूट ३ इंच
- मृगा (मोठी मुलगी) : ६ फूट २ इंच
- सान्या (लहान मुलगी) : ६ फूट ४ इंच




# शिव सहस्रनाम स्तोत्रम् – अर्थासह मराठी भावार्थानुसार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**१) मंगलाचरण**

**“ श्रीगणेशाय नमः।**
**श्रीगुरुभ्यो नमः।**
**श्रीमहादेवाय नमः॥ ”**

**भावार्थ :** सर्वप्रथम विघ्नहर्ता गणेश, जगतगुरू शिव आणि परमात्मा महादेव यांना नमन करून हे स्तोत्र आरंभिले आहे. ज्यांच्या कृपेने ज्ञान, शक्ती आणि शांती एकवटते, त्या सदाशिवाला वंदन.

**२) स्तोत्राची उत्पत्ती कथा**

देवी पार्वती यांनी भगवान शंकर यांना विचारले–

“ हे देवाधिदेव महेश! तुझी सहस्र नावे कोणती ?
त्या नावांच्या स्मरणाने भक्ताला काय फळ प्राप्त होते ?”

तेव्हा भगवान शिव म्हणाले–

“हे देवी, ज्याने माझी सहस्र नावे भक्तिभावाने जपली त्याला सर्व पापांपासून मुक्ती मिळते. आयुष्य, आरोग्य आणि ऐश्वर्य प्राप्त होते. ही नावे मी ब्रह्मदेवापासूनही गुप्त ठेवली होती. आता तुझ्या आग्रहाने प्रकट करतो.”

## शिव सहस्रनाम स्तोत्रम्

**१) ॐ स्थिरः स्थाणुः प्रभुर्भीमः प्रवरो वरदो वरः।**
**सर्वात्मा सर्वविख्यातः सर्वः सर्वकरो भवः॥**

**अर्थ :** शिव स्थिर आहेत. म्हणजे अचल व निर्विकार. स्थाणू ज्यांना काही हलवू शकत नाही. प्रभू सर्वांचे अधिपती, भीम ज्यांचा प्रभाव प्रचंड, वरद सर्व इच्छित वर देणारे, सर्वात्मा सर्व प्राण्यांत वास करणारे परमात्मा आहेत.

भावार्थ : हा श्लोक भगवान शिव यांच्या विश्वात्मक स्वरूपाचे वर्णन करतो. ज्याच्यात संपूर्ण सृष्टी स्थित आहे. तो स्वतः अविचल आणि सर्वश्रेष्ठ आहे. शिव यांचे स्वरूप सर्वांमध्ये एकच आहे. जीवात्म्यातील तोच परमात्मा.

**२) जटी चर्मी शिखी खी सर्वाङ्गः सर्वभावनः।**
**हरश्च हरिणाक्षश्च सर्वभूतहरः प्रभुः॥**

**अर्थ :** जटी जटाधारी, चर्मी मृगचर्मधारी, शिखी अग्निरूपी तेजस्वी, खी दिव्य अस्त्रधारी, सर्वभूतहर सर्वांचे पाप नष्ट करणारे प्रभू.

**भावार्थ :** भगवान शिव यांची जटाजूट गंगेला धारण करते. मृगचर्म त्यांचा संयम दर्शविते. तेजस्वी अग्निरूप, परंतु पापहारक करुणामूर्ती आहेत. शिव विनाशक नाहीत तर शुद्धीकरण करणारे तत्त्व आहेत.

**३) प्रवृत्तिश्च निवृत्तिश्च नियतः शाश्वतो ध्रुवः।**
**श्मशानवासी भगवान्खचरो गोचरोऽर्दनः॥**


**अर्थ :** भगवान शिव प्रवृत्ती व निवृत्ती दोन्ही मार्गांचे अधिष्ठाता आहेत. शाश्वत, ध्रुव व नियतस्वरूप आहेत. श्मशानवासी म्हणजे अनित्यतेचे प्रतीक. आकाशात विहरणारे. सर्व गोचरांपलीकडील परमात्मा.

**भावार्थ :** भगवान शिव जीवन आणि मृत्यू दोन्हींचे तत्त्व जाणतात. श्मशानवासी असणे म्हणजे अनित्यतेचे ध्यान जे नाशवान आहे त्यापलीकडे जाणे हाच शिवमार्ग आहे.

**४) अभिवाद्यो महाकर्मा तपस्वी भूतभावनः।**
**उन्मत्तवेषप्रच्छन्नः सर्वलोकप्रजापतिः॥**

**अर्थ :** अभिवाद्य, पूजनीय, महाकर्मा, महाकर्ता, तपस्वी महान तपश्चर्या करणारे, उन्मत्तवेष, विलक्षण रूप धारण करणारे, सर्व लोकांचे प्रजापती.

**भावार्थ :** भगवान शिव अनेकदा अघोरी स्वरूपात दिसतात. पण त्यामागे ब्रह्मज्ञानाची गूढता दडलेली असते. ते सर्व लोकांचे पालनकर्ते आहेत. त्यांच्या तपश्चर्येमुळे सृष्टी संतुलित राहते.



**५) महारूपो महाकायो वृषरूपो महायशाः।**
**महात्मा सर्वभूतात्मा विश्वरूपो महाहनुः॥**

**अर्थ :** भगवान शिव विशाल रूपाचे, वृषरूपी (धर्मस्वरूप), महायशस्वी, सर्वभूतांचे आत्मस्वरूप, विश्वरूप व महाशक्तिमान आहेत.

**भावार्थ :** भगवान शिव हे विश्वाचा आत्मा आहेत. त्यांचे वृषरूप धर्माचे प्रतीक आहे. सत्य, संयम आणि श्रद्धा, त्यांचे विश्वरूप प्रत्येक कणात व्यापलेले आहे.

**६) लोकपालोऽन्तर्हितात्मा प्रसादो हयगर्दभिः।**
**पवित्रं च महांश्चैव नियमो नियमाश्रितः॥**

**अर्थ :** भगवान शिव लोकपाल (संरक्षक), अंतःस्थित आत्मा, पवित्रता आणि प्रसादाचे मूर्तिमंत रूप आहेत. ते नियमस्वरूप असून सर्व धर्मनियमांचे अधिष्ठान आहेत.

**भावार्थ :** भगवान शिव हे धर्माचा मूलस्तंभ आहेत. त्यांचे अंतःकरण सर्वत्र व्यापलेले आहे. ते पवित्रता आणि संयम यांचे प्रतीक आहेत.

**७) सर्वकर्मा स्वयम्भूत आदिरादिकरो निधिः।**
**सहस्राक्षो विशालाक्षः सोमो नक्षत्रसाधकः॥**

**अर्थ :** भगवान शिव सर्व कर्मांचे मूळ, स्वयंभू, सृष्टीचा आदिप्रेरक आणि ज्ञाननिधी आहेत. ते सहस्र नेत्रांचे, विशाल दृष्टिकोन असणारे आणि चंद्रासारखे शीतल आहेत.

**भावार्थ :** ते सृष्टीचे मूल आहेत. स्वतःहून उत्पन्न झालेले. त्यांच्या सहस्र नेत्रांचा अर्थ म्हणजे सर्वदृष्टी, ज्यांच्या दृष्टीसमोर काहीही लपलेले नाही.

**८) चन्द्रः सूर्यः शनिः केतुर्ग्रहो ग्रहपतिर्वरः।**
**अत्रिरत्र्यानमस्कर्ता मृगबाणार्पणोऽनघः॥**

**अर्थ :** भगवान शिव चंद्र, सूर्य, शनी, केतू आणि सर्व ग्रहांचे अधिपती आहेत. ते दोषरहित (अनघ) व सर्व ग्रहबाधा नाश करणारे आहेत.

**भावार्थ :** भगवान शिव यांच्या कृपेने ग्रहदोष नाहीसे होतात. त्यांचे त्रिनेत्र सूर्य, चंद्र आणि अग्नीचे प्रतीक आहेत. ग्रहांना संतुलन देणारे एकमेव देव म्हणजे भगवान महादेव.

**९) महातपा घोरतपा अदीनो दीनसाधकः।**
**संवत्सरकरो मन्त्रः प्रमाणं परमं तपः॥**

**अर्थ :** भगवान शिव महान तपस्वी, घोर तपाचे आचार्य, दीनांचे आधार, संवत्सराचे निर्माता आणि परम तपस्वरूप आहेत.

**भावार्थ :** भगवान शिव यांचे तप म्हणजे संपूर्ण सृष्टीचे स्पंदन. ते दीनांच्या हृदयात आशा प्रज्वलित करतात. त्यांचे अस्तित्व म्हणजे अखंड साधना व संयम.

**१०) योगी योज्यो महाबीजो महारेता महाबलः।**
**सुवर्णरेताः सर्वज्ञः सुबीजो बीजवाहनः॥**

**अर्थ :** शिव सर्वोच्च योगी, योगाचे अधिष्ठाता, महाबीजस्वरूप, सर्वज्ञ आणि अमोघ बलाचे अधिष्ठान आहेत.

**भावार्थ :** भगवान शिव योगाचे मूर्तिमंत तत्त्व आहेत. त्यांचे बीज म्हणजे ‘ ॐ ’ ज्यातून सर्व विश्व उत्पन्न झाले. ते सर्वज्ञ, सर्वबलसंपन्न आणि अनंत ज्ञानाचे अधिष्ठान आहेत.

**११) दशबाहुस्त्वनिमिषो नीलकण्ठ उमापतिः।**
**विश्वरूपः स्वयंश्रेष्ठो बलवीरो बलो गणः॥**

**अर्थ :** दशबाहू, दहा भुजा असलेले, अनिमिष डोळे न मिचकावणारे, सदैव जागरूक, नीलकंठ, विषपानाने कंठ निळा झालेले, उमापती, पार्वतीचे स्वामी, विश्वरूप, सर्व विश्वात व्यापलेले, स्वयंश्रेष्ठ, स्वतःमध्येच श्रेष्ठ, बलवीर, अजेय, शक्तिमान.

**भावार्थ :** भगवान शंकर हे जागृतीचे प्रतीक आहेत. त्यांचे नीलकंठ स्वरूप विषपानाने सृष्टीचे रक्षण दर्शविते. ते सर्व विश्वाचे स्वामी असून, अंतःशक्तीने युक्त, ज्ञान, बल व करुणेचे केंद्र आहेत.

**१२) गणकर्ता गणपतिर्दिग्वासाः काम एव च।**
**मन्त्रवित्परमो मन्त्रः सर्वभावकरो हरः॥**

**अर्थ :** गणकर्ते, गणांचे निर्माते, गणपती त्यांचा अधिपती, दिग्वासाः दिशांना वस्त्र मानणारे (निर्लेप), मन्त्रवित् सर्व मंत्रांचे ज्ञाता, परम मंत्रस्वरूप हर सर्व भावनांना दिशा देणारे.

**भावार्थ :** भगवान शिव स्वतः गणनायक असून, गणेशाचे मूळ तत्त्व आहेत. ते वस्त्रहीन म्हणजे संसारमोहापासून मुक्त आहेत. त्यांचा प्रत्येक शब्द मंत्रस्वरूप आहे. कारण ते सत्यातून उद्भवते.

**१३) कमण्डलुधरो धन्वी बाणहस्तः कपालवान्।**
**अशनी शतघ्नी खी पट्टिशी चायुधी महान्॥**

**अर्थ :** कमंडलू हातात धारण करणारे, धनुष्य व बाणधारी, कपाल धारण करणारे, अनेक आयुधांनी सज्ज. ख, पट्टिश, शतघ्नी, अशनी यांचे धारण करणारे.

**भावार्थ :** भगवान शिव यांचे प्रत्येक अस्त्र म्हणजे कर्माची विविध रूपे आहेत. ते नाश करीत नाहीत, तर अज्ञानाचा विनाश करतात. कपाल हे स्मरण आहे. मृत्यूही सृष्टीचा एक भाग आहे.

**१४) स्रुवहस्तः सुरूपश्च तेजस्तेजस्करो निधिः।**
**उष्णीषी च सुवक्त्रश्च उदग्रो विनतस्तथा॥**

**अर्थ :** स्रुवहस्त यज्ञातील आहूती देणारा हात, सुरूप सुंदर रूपाचा, तेजस्वी तेज देणारा, उष्णीषी मस्तकावर वस्त्रधारी, सुवक्त्र मंगलमुखी, विनत नम्र.

**भावार्थ :** भगवान शिव यांचे सौंदर्य बाह्य नव्हे, तर आत्मिक तेजात आहे. ते यज्ञस्वरूप आहेत, त्यांच्या विनम्रतेत अपार सामर्थ्य आहे. नम्रतेतूनच खरे तेज प्रकट होते, हेच त्यांचे तत्त्व आहे.

**१५) दीर्घश्च हरिकेशश्च सुतीर्थः कृष्ण एव च।**
**शृगालरूपः सिद्धार्थो मुण्डः सर्वशुभङ्करः॥**

**अर्थ :** दीर्घ विशाल देहाचे, हरिकेश सुवर्णवर्णी केशधारी, सुतीर्थ सर्व पवित्र स्थळांचे अधिष्ठान, शृगालरूप स्मशानातील तत्त्वाचे प्रतीक, सिद्धार्थ साधनेने सिद्धी प्राप्त करणारे, सर्वशुभंकर कल्याणकारक.

**भावार्थ :** भगवान शिव यांच्या प्रत्येक रूपात योग आणि तत्त्वज्ञान आहे. त्यांचे शृगालरूप स्मशानातील अनित्यतेचे ज्ञान देतो. शिव हे सत्य आणि शुभतेचे मीलनबिंदू आहेत.

**१६) अजश्च बहुरूपश्च गन्धधारी कपर्द्यपि।**
**ऊर्ध्वरेता ऊर्ध्वलिङ्ग ऊर्ध्वशायी नभःस्थलः॥**

**अर्थ :** अज अजन्मा, बहुरूप अनेक स्वरूपांनी युक्त, गंधधारी सुगंधयुक्त, कपर्द्य जटायुक्त, ऊर्ध्वरेता शक्तीचा संचय करणारे, ऊर्ध्वलिंग आत्मोन्नतीचे प्रतीक.

**भावार्थ :** भगवान शिव यांचे ऊर्ध्वरेता रूप हे ब्रह्मचर्य आणि शक्तिनियंत्रणाचे द्योतक आहे. ते अनेक रूपांत प्रकट होतात, पण स्वरूप एकच परब्रह्म. त्यांचे लिंग हे सृजनशक्ती आणि शिवशक्तीचे एकत्व दर्शविते.

**१७) त्रिजटी चीरवासाश्च रुद्रः सेनापतिर्विभुः।**
**अहश्चरो नक्तञ्चरस्तिग्ममन्युः सुवर्चसः॥**

**अर्थ :** त्रिजटी तीन जटाधारी, चीरवास वाळवंटवासी संयमी, रुद्र कोप आणि करुणेचे मिश्र रूप, अहश्चर दिवसात विहरणारा, नक्तंचर रात्रीही कार्यशील.

**भावार्थ :** भगवान शिव दिनरात्री समत्व राखतात. त्यांचा कोपही करुणेच्या रूपात असतो. त्यांची जटा ब्रह्मज्ञानाची गुंफण आहे आणि चीरवास वैराग्याचे प्रतीक.

**१८) गजहा दैत्यहा कालो लोकधाता गुणाकरः।**
**सिंहशार्दूलरूपश्च आर्द्रचर्माम्बरावृतः॥**

**अर्थ :** गजहा गजासुराचा संहार करणारे, दैत्यहा दैत्यविनाशक, काल काळाचे अधिपती, गुणाकर सर्व गुणांचे स्रोत, सिंहरूप साहसाचे प्रतीक.

**भावार्थ :** भगवान शिव यांचा संहार म्हणजे अधर्माचा नाश आणि धर्माची स्थापना. त्यांचा सिंहस्वरूप धैर्य देतो. ते गुणांचे मूळ आहेत. जेथे ते आहेत तेथे धर्म स्थिर आहेत.

**१९) कालयोगी महानादः सर्वकामश्चतुष्पथः।**
**निशाचरः प्रेतचारी भूतचारी महेश्वरः॥**

**अर्थ :** कालयोगी काळावर नियंत्रण असलेले योगी, महानाद ओंकारस्वरूप, सर्व काम सर्व इच्छांची पूर्तता करणारे, प्रेतचारी मृत्यूतत्त्वाचे ज्ञान देणारे, महेश्वर सर्वश्रेष्ठ ईश्वर.

**भावार्थ :** भगवान शिव ‘ महानाद ’ म्हणजे ओंकार. ज्यातून सृष्टी उत्पन्न झाली. ते मृत्यूला देखील मोक्षाचे द्वार बनवितात. ते सर्व कामना पूर्ण करतात, पण आसक्तीपासून मुक्त ठेवतात.

**२०) बहुभूतो बहुधरः स्वर्भानुरमितो गतिः।**
**नृत्यप्रियो नित्यनर्तो नर्तकः सर्वलालसः॥**

**अर्थ :** बहुभूत अनेक रूपांत प्रकट, बहुधर सर्वांचे धारक, स्वर्भानु तेजोमय सूर्यसमान, नृत्यप्रिय आनंदमूर्ती नटराज, नर्तक सृष्टीच्या तालावर नाचणारे.

**भावार्थ :** भगवान शिव यांचे नृत्य म्हणजे सृष्टीचे स्पंदन. त्यांचे नटराज रूप निर्माण, पालन, संहार या तिन्ही तत्त्वांचे संतुलन दर्शविते. ते विश्वाच्या लयीत आनंदाने नृत्य करणारे अनंत सत्य आहेत.

**(क्रमशः)**

# रुद्राभिषेक : प्रभावी अधिष्ठान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कलियुगात आपल्यावर येत असलेल्या नाना प्रकारच्या संकटांतून आपली सुटका करावयाची असल्यास तसेच आपल्या वास्तूतील दोष व कलह परिहार करण्यासाठी, सर्व विघ्ने दूर होण्यासाठी, सर्व रोग नाहीसे होऊन दीर्घायुष्य प्राप्त व्हावे यासाठी, विद्या व लक्ष्मी प्राप्तीसाठी आणि मनातील इच्छा पूर्ण होण्यासाठी, श्रीशिवांचे आशीर्वाद मिळविण्यासाठी आपल्याला रुद्राभिषेक हे प्रभावी अनुष्ठान आहे. रुद्राभिषेक आपल्या कुलदेवी अथवा भगवान श्री महादेवांना आपल्या घरीच वर्षातून एक तरी करावा. अभिषेक करून त्याचे तीर्थ पूर्ण वास्तूमध्ये शिंपडावे. या सूक्ताचे पठण करण्याच्या विशिष्ट पद्धती आहेत. त्यामध्ये एकादशिनी, लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र इत्यादी प्रयोग आहेत. श्रावणी सोमवार, महाशिवरात्री अशा पवित्र दिवशी लघुरुद्र करण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे काही लोक रोजच्या पूजेत अभिषेकावेळी रुद्र म्हणतात.

### भगवान शंकर यांचे विविध संख्यावाचक अभिषेक

रुद्र एकादशिनी अभिषेक : (रुद्र एकादशिनी)– ११ आवर्तने.
लघुरुद्र अभिषेक : (लघुरुद्र)–१२१ आवर्तने.
महारुद्र अभिषेक : (महारुद्र)– १३३१ आवर्तने.
अतिरुद्र अभिषेक : (अतिरुद्र)– १४६४१ आवर्तने.
(महत्त्वाचे – हे विधान आपल्या वास्तूमध्ये करावे.)
श्रीगुरुचरित्रामध्ये रुद्राभिषेकाचे महत्त्व सांगितलेले आहे.

### लघुरुद्र आणि अतिरुद्र

अनेक ठिकाणी भगवान शंकर यांच्या देवळांतून लघुरुद्र केले जातात व अभिषेक केले जातात. अभिषेक हे प्रतीक आहे. अभिषेकपात्रातून पाण्याची धार जशी सतत परमेश्वरावर पडत असते तसे आपले मन सतत परमेश्वरचरणी असले पाहिजे. रुद्र हे भगवान शंकर यांचे एक स्तोत्र आहे. ते अकरा वेळा म्हटले, की एक एकदष्णी होते. अकरा एकदष्णीचा एक लघुरुद्र. अकरा लघुरुद्रांचा एक महारुद्र आणि अकरा महारुद्र केले की एक अतिरुद्र होतो. अशाप्रकारे अभिषेक करणे ही अभिषेक भक्तीची, उपासनेची एक पद्धत आहे. रुद्र आवर्तनातील सर्व श्लोक संस्कृतमध्ये आहेत. रुद्र म्हणण्याची विशिष्ट लय व पद्धती आहे. त्याचप्रमाणे त्याचे उच्चार करावे लागतात म्हणून रुद्राभिषेक हा जाणकार ब्राह्मणांकडून करून घ्यावा लागतो. ते वेदमंत्र असल्याने त्यात शक्ती आहे. योग्य पद्धतीने उच्चार झाल्यावर ती शक्ती कार्यरत होते व अनुभवाला येते. रुद्राभिषेक घरात, बाहेर कोठेही, क्षेत्राचे ठिकाणी केव्हाही केला तरी चालतो. हा अगोदर ठरवून करावा. विशेषतः प्रदोष, सोमवार, एकादशी अशा दिवशी केलेला उत्तम. तुमच्या सवडीने महिन्यातून वरीलपैकी कोणताही एक दिवस ठरवा व रुद्राभिषेक करा. त्याचा तुम्हाला हमखास फायदा मिळेल. रुद्र हा एकदा ऐकून भागत नाही. तो पुन्हा पुन्हा ऐकावा लागतो. म्हणजे अडथळे दूर होऊन प्रगती साधली जाते. रुद्र हे वेदमंत्र असल्याने त्याचे जसजसे उच्चारण होते तसतशा देवता तेथे उत्पन्न होतात व लोककल्याण करतात.



### रुद्राभिषेकाचे फायदे

**अ) घराण्याचे दोष कमी होणे :**

कुठल्याही व्यक्तीच्या मृत्यूपूर्वी सर्व इच्छा पूर्ण होतातच असे नाही. त्यातूनच पितृदोष निर्माण होतात. पितृदोषांमुळे घराणीच्या घराणी नाहीशी झाल्याची उदाहरणे आहेत. कुंडलीत पितृदोष हे राहूचे दोष या नावाने दर्शविले जातात. राहूचे दोष इतके वाईट असतात, की जगणे मुश्कील करतात. काही घरात सर्व सुखसोयी असूनही अस्वस्थता असते. काही घरांत कारण नसताना सतत भांडणे होतात. काही घरांत जेवण तयार असून शांत रीतीने खायला मिळत नाही. या सर्वांवर उपाय म्हणजे शिवोपासना करणे.

**ब) मनोविकार कमी होणे :**


रुद्र आवर्तने ऐकल्यावर कालांतराने मनोविकार कमी होतात. तुमच्याकडे जेव्हा लघुरुद्र/ महारुद्र करता तेव्हा तुम्हाला समजत जरी नसले तरी ते ऐकावे, श्रवण करावे. यामुळे हे सूक्ष्म मनोविकार वाढत नाहीत व असतील तर पुढे नाहीसे होतात.

**क) पाऊस पडणे :**

पाऊस पडत नसेल तर सामुदायिक प्रार्थनेचा जरूर उपयोग होतो व ईश्वरीशक्ती आपले कार्य करते. पूर्वीच्या काळी पावसासाठी यज्ञही करीत असत. शिविंलगावर अभिषेक करत असत. तसा अभिषेक म्हणजे पाण्याची संततधार आपण ठेवली तरी पाऊस पडण्यास मदत होते. परंतु अशी पाण्याची संततधार पाऊस पडेपर्यंत ठेवायला लागते.

**ड) भूकंपापासून रक्षण :**

सध्या लहान–मोठे भूकंप सतत खूप ठिकाणी होत आहेत. जेथे जमीन पोकळ असते तेथे असे भूकंप होत असतात. पोकळ जमिनीतून स्वयंभू शिविंलगे बाहेर येत असतात. म्हणून ती पोकळ जमीन टणक होण्यासाठी आपल्याकडे रुद्राभिषेक करून शिवाला शांत करण्याची पद्धत आहे. तेव्हा तुम्ही सर्वांनी आपापल्या घरी अथवा देवदेवळांतून रुद्राभिषेक जरूर करावेत. त्यामुळे तुमच्या सर्वांचे भूकंपापासून रक्षण होईल.







(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)